सन २०१६-१७ ची प्रलंबित देयके सन
२०१७-१८ मध्ये निकाली काढणेबाबत

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला
## अर्थ प्रशासन विभाग

---

जा.क्र.अप्रवि/अंदाज/प्रलंबित देयके/२०१६-१७/ 92 /२०१७ दिनांक: ०५/०४/२०१७

परिपत्रक

सन २०१६-१७ या वर्षाकरीता शासनाने मंजूर केलेले योजनेत्तर अनुदान संबंधीत योजना/ विभागांना वितरीत केलेले होते. अनुदान सुत्रानुसार विहित टक्केवारीने अनुज्ञेय होत असलेले आकस्मिक अनुदान काही योजना/ विभागांना त्यांचा आकस्मिक खर्च भागविण्याकरता अपुरे पडते, म्हणून संबंधीत योजना/ विभागांनी आर्थिक वर्षात प्राप्त केलेले महसुली उत्पन्नाच्या ३५ टक्के रक्कम त्याचा अतिरीक्त खर्च भागविण्यासाठी विद्यापीठाने परवानगी दिलेली आहे. प्रत्येक योजना/ विभागांने अशारीतीने अनुदान व ३५ टक्के महसुली उत्पन्न मिळून उपलब्ध होणाऱ्या रक्कमेतून त्याचा आकस्मिक खर्च भागविला जाईल असे नियोजन करुन खर्च सिमीत करणे अपेक्षित आहे. तथापी असे निदर्शनास आले आहे की, बरेच विभाग या मर्यादेपेक्षा अधिक खर्च करतात परिणामी विद्यापीठास एकत्रित आकस्मिक खर्च अधिक होतो. तसेच असेही निदर्शनास आले आहे की, मागील आर्थिक वर्षात विहीत मर्यादेपेक्षा अधिक खर्च होऊन आकस्मिक खर्चाची बरीच देयके प्रलंबित आहेत, विद्यापीठाप्रति निर्माण झालेले हे दायित्व आर्थिक देयके निकाली काढणे अपरिहार्य आहे. म्हणून सर्व कार्यान्वयन अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे अखेरीस प्रलंबित असलेले देयके निकाली काढण्याकरीता सोबत जोडलेल्या विवरणपत्रात माहिती या विभागास दि.३०एप्रिल,२०१७ पर्यंत पाठवावी. प्रलंबित देयके निरंक असल्यास खर्चाचे विवरण सुध्दा या विभागास पाठविण्यात यावे. प्रलंबित देयके निकाली काढण्याकरिता स्वतंत्र प्रस्ताव पाठविण्यात येऊ नये.

नियंत्रक,
डॉ. पं.दे.कृ. वि., अकोला

प्रत: माहिती व पुढील उचित कार्यवाहीकरीता
१. आहरण व संवितरण अधिकारी (सर्व)
२. विभागप्रमुख (सर्व)
३. नियंत्रण अधिकारी (सर्व)

सन २०१६-१७ चे मंजुर अनुदान, प्राप्त महसुली उत्पन्न व झालेला प्रत्यक्ष खर्च व विभागाकडे प्रलंबित असलेले देयके इत्यादीचा तपशिल दर्शविणारा तक्ता

प्रपत्र-अ

कार्यालयाचे /योजनेचे नांव :-----------------------------------------------------------

| अ.क्र. | खर्चाची बाब | २०१६-१७ मध्ये वितरीत केलेले अनुदान | १६-१७ मध्ये प्रत्यक्ष प्राप्त महसुली उत्पन्न | महसुली उत्पन्नामधून खर्चास उपलब्ध करुन दिलेली रक्कम | सन २०१६-१७ खर्चा करीता उपलब्ध झालेली तरतुद (३+५) | २०१६-२०१७ चा प्रत्यक्ष खर्च | विभागाकडे प्रलंबित असलेली देयके | प्रलंबित असल्याची कारणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| अ | वेतन | | | | | | | | |
| ब | आकस्मिक | | | | | | | | |
| १ | मजुरी | | | | | | | | |
| २ | प्रवास खर्च | | | | | | | | |
| ३ | कार्यालयीन खर्च | | | | | | | | |
| ४ | इंधन व जळण | | | | | | | | |
| ५ | साधन सामग्री | | | | | | | | |
| ६ | कर/ भाडे | | | | | | | | |
| ७ | खते/ किटकनाशके | | | | | | | | |
| ८ | बि-बियाणे | | | | | | | | |
| ९ | इतर खर्च | | | | | | | | |
| | एकूण ब | | | | | | | | |
| | एकूण अ + ब | | | | | | | | |

टिप : वेतनावरील खर्च हा फक्त राज्य शासन अनुदानाच्य अनुषंगाने योजनेतर योजनाबाबतीतचा (Non-Plan अंतर्गत) फक्त नमूद करावा.

कार्यान्वयन अधिकाऱ्याची सही

कृपया मागे पहा........

<u>प्रपत्र – ब</u>

| अ.क्र. | खर्चाची बाब | देयक क्रमांक | देयक दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

कार्यान्वयन अधिकाऱ्याची सही